**तात्काळ व महत्वाचे**

जा.क्र.पोमसं /२३/सीसीटीएनएस/ ४२५ /२०१८ पुणे, दिनांक : १९/११/२०१८

**विषय:-** सी.सी.टी.एन.एस. प्रकल्पांतर्गत स्टेशन डायरी नोंदवही उपलब्ध असल्याने हाताने लिहिण्यात येणारे स्टेशन डायरी नोंदवही बंद करण्याबाबत...

----

## परिपत्रक

महाराष्ट्र राज्य पोलीस दलामध्ये सी.सी.टी.एन.एस. प्रकल्प दिनांक १५ सप्टेंबर २०१५ पासुन कार्यान्वित करण्यात आला आहे. सी.सी.टी.एन.एस. प्रकल्पामध्ये पोलीस स्टेशनसाठी नेहमी उपयोगी पडणारे रजिस्टर्स, रिपोर्टस काढता येतात. या प्रणालीमध्ये अनेक सुविधा उपलब्ध असल्याने व आवश्यकता असेल तेव्हा त्यांच्या प्रिंट आऊट काढता येत असल्याने पारंपारीक पध्दतीने ठेवण्यात येणारी स्टेशन डायरी नोंदवही बंद करण्याची आवश्यकता आहे.

असे निदर्शनास आले आहे की, सध्या पोलीस स्टेशनच्या दैनंदिन कामकाजाच्या नोंदी स्टेशन डायरी (जनरल डायरी) मध्ये केल्या जातात व त्यानंतर या नोंदी सी.सी.टी.एन.एस. मधील जनरल डायरीमध्ये घेतल्या जातात. अशा प्रकारे एकच काम दोन वेळा केले जात असल्याने त्यामध्ये कालापव्य होतो.

तरी याव्दारे आदेशीत करण्यात येते की, हाताने लिहिण्यात येणारी स्टेशन डायरी नोंदवही बंद करुन याबाबतच्या सर्व नोंदी सी.सी.टी.एन.एस. प्रणालीमध्ये कराव्यात. प्रत्येक दिवसाच्या २४ तासाच्या नोंदींची स्टेशन डायरी प्रिंट आऊट सी.सी.टी.एन.एस. मधुन रोज रात्रौ ००.०१ वाजता काढून पोलीस स्टेशनच्या अभिलेखावर जतन करण्यात यावी.

(दत्ता पडसलगीकर) १९/११/१८
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
सर्व पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव -

अपर पोलीस महासंचालक, का. व सु., महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र.